# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-४३५-२०२४ दिनांक-१५/११/२०२४

## प्रेस नोट

### " अंमली पदार्थाची तस्करी करणा-या दोघा विरोधात कारवाईत ३ किलो ७०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात गुन्हे शाखा कक्ष - ३ विरार यांना यश "

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ विक्री व तस्करी करणा-या इसमाविरुध्द कडक कारवाई करुन पायबंद करणे बाबत मा. वरिष्ठांकडुन सुचना दिल्या आहेत.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पेट्रोलिंग दरम्यान दिनांक १४/११/२०२४ रोजी १६.३० वाजता विरार पुर्व, येथील नारंगी रेल्वे फाटक जवळ एनटॉर्क कंपनीची मोटारसायकल क्रमांक एम.एच. ४८ सि. एम. २८४९ वरुन जाणारे आरोपीत नामे - १) राहुल नंदु घरत वय - २४ वर्षे, रा.नारंगी गाव, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर २) अक्षय अनिल पडयाळ, वय - २८ वर्षे, रा. जिवदनी वंदन बिल्डींग, डोंगर पाडा, देशमुख गल्ली, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर. यांचे कब्जातुन ३ किलो ७०० किलोग्राम वजनाचा गांजा नावाचा अंमली पदार्थ व एनटॉर्क कंपनीची मोटारसायकल असा एकुण १,९४,१००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर आरोपीत विरुध्द विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ७९४/२०२४ एन.डी.पी.एस. कलम ८(क), २२ प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास विरार पोलीस ठाणे करीत आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/ प्रमोद बडाख, सपोनि/ सोपान पाटील, पोउपनिरी/ उमेश भागवत, पोउपनिरी/ ज्ञानेश्वर आव्हाड, सफौ/ अशोक पाटील, पोहवा/मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुमीत जाधव, युवराज वाघमोडे, सुनिल पाटील, मनोहर तारडे, तुषार दळवी, अतिष पवार, म.सु.ब/ प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ विरार तसेच सफौ/ संतोष चव्हाण, सायबर सेल यांनी पार पाडली आहे.

----oooo----